RNI No. MAHBIL /2009/37831

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-ब

वर्ष ९, अंक ७३] बुधवार, मे ३१, २०२३/ज्येष्ठ १०, शके १९४५ [पृष्ठे २, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक २१०**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

### उच्च व तंत्र शिक्षण विभाग

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई ४०० ०३२, दिनांक ३१ मे २०२३.

**अधिसूचना**

**महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६.**

क्रमांक संकिर्ण-२०२३/ प्र.क्र.९८/ विशि-३.—महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (२०१७ चा महा. अधिनियम क्र. ६) याच्या कलम ७२ चे पोट-कलम (१०) अन्वये प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून कलम ७१ चे पोट-कलम (७) तसेच कलम १२२ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन, याद्वारे, विद्यापीठांशी संलग्न असलेली महाविद्यालये, मान्यताप्राप्त परिसंस्था, संचालित महाविद्यालये व घटक महाविद्यालये यांना स्वायत्तता देण्याच्या मानकांशी संबंधित असणारे पुढील एकरूप परिनियम विहित करीत आहे :—

**२०२३ चा एकरूप परिनियम क्रमांक ३**

**१. संक्षिप्त नाव व प्रयुक्ती.—**

(१) या परिनियमास, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (संलग्न महाविद्यालये, मान्यताप्राप्त परिसंस्था, संचालित महाविद्यालये व घटक महाविद्यालये यांना स्वायत्तता देण्याची मानके) एकरूप परिनियम, २०२३, असे म्हणावे.

(२) हे परिनियम, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ खालील महाराष्ट्र राज्यातील विद्यापीठांशी संलग्न असलेल्या स्वायत्त दर्जा प्रदान करण्याची मागणी करणाऱ्या, सर्व महाविद्यालयांना किंवा विद्यापीठांनी मान्यता दिलेल्या परिसंस्थांना किंवा विद्यापीठांच्या संचालित महाविद्यालयांना किंवा घटक महाविद्यालयांना लागू असतील.

**२. स्वायत्त दर्जा प्रदान करण्याच्या तरतुदी आणि स्वायत्त महाविद्यालये व परिसंस्था यांच्यामधील दर्जा राखण्याच्या उपाययोजना.—**

(१) विद्यापीठ अनुदान आयोग (महाविद्यालयांना स्वायत्त दर्जाचे प्रदान करणे आणि स्वायत्त महाविद्यालयांमधील दर्जा राखण्याच्या उपाययोजना) विनियम, २०२३ याच्या तरतुदी, तसेच यासंदर्भात विद्यापीठ अनुदान आयोगाकडून वेळोवेळी करण्यात येणाऱ्या सुधारणा, स्वायत्त दर्जा प्रदान करण्याची मागणी करणाऱ्या विद्यापीठांशी संलग्न असलेल्या सर्व महाविद्यालयांना, मान्यताप्राप्त परिसंस्थांना, संचालित महाविद्यालयांना व घटक महाविद्यालयांना लागू असतील.

(२) हे परिनियम, **महाराष्ट्र शासन राजपत्रात**, प्रसिद्ध केल्याच्या दिनांकास व तेव्हापासून, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (संलग्न महाविद्यालयांना, मान्यताप्राप्त परिसंस्थांना व संचलित किंवा घटक महाविद्यालयांना स्वायत्तता देण्याची मानके) एकरूप परिनियम, २०१८ (२०१९ चा एकरूप परिनियम क्रमांक ३) निरसित होईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**विकास चंद्र रस्तोगी,**
शासनाचे प्रधान सचिव.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.